# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४

ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com


रजिस्टर पोस्टाने

जा.क्र.मजीप्रा-२०२६/प्र.क्र.१०/आस्था-६ दिनाक :-२७/०३/२०२६

## कार्यालयीन आदेश

**वाचा :-** १ सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/ बारा, दिनांक २१ जून, २०२१

२ म.जी.प्रा. आदेश क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.३५/आस्था-६, दि.२७.२.२०२६

महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ प्रक्रियेअंती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस केलेल्या ४५ उमेदवारांना उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील दि.२७ फेब्रूवारी, २०२६ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर सहाय्यक अभियंता श्रेणी-२ (स्थापत्य) गट-ब (सरळसेवा) या पदावर सरळसेवेने नियुक्ती देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशातील परिच्छेद ३ (४) नुसार आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत उमेदवारांनी रुजू होण्याच्या सुचना दिलेल्या असून सदर पदावर रुजू न झाल्यास त्यांची नियुक्ती आपोआप रद्द होईल, तसेच एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य कारणास्तव रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास त्यांना सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुदतवाढीचा अर्ज सादर करण्याबाबत नमुद करण्यात आलेले आहे.

२. सद्यस्थितीत काही उमेदवारांनी ते पूर्वीच्या कार्यरत कार्यालयातून कार्यमुक्त न केल्याने तसेच इतर कारणास्तव रुजू होण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती अर्ज सादर केले आहेत. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णय/अधिसुचने मधील तरतुदी विचारात घेता तसेच उमेदवारांचे विनंती विचारात घेता, अद्याप रुजू न झालेल्या सर्व उमेदवारांना या आदेशान्वये रुजू होण्यासाठी १५ दिवसांची म्हणजेच दिनांक १३.०४.२०२६ पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे.

३. संबंधित उमेदवारांनी त्यांना देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या दिनांकापर्यत त्यांची नियुक्ती केलेल्या संबंधित कार्यालयात रुजू होणे आवश्यक आहे.

४. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक २७.२.२०२६ च्या नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच लागू राहतील.

मा.सदस्य सचिव यांचे मान्यतेने.

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**प्रत माहितीसाठी सादर :-**

- मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

(कृ.मागे पहावे)

Scanned with OKEN Scanner

- अभियान संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर नवी मुंबई.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :-**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडकोभवन (दक्षिण कक्ष), नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर.

  संबंधित उमेदवार मुदतवाढीच्या दिनांकापर्यत रुजू न झाल्यास त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयास अवगत करावे. तसेच रुजू झालेल्या उमेदवारांचे रुजू अहवाल तात्काळ सादर करावेत.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ जळगाव/ अहिल्यानगर/छत्रपती संभाजीनगर/लातूर/नांदेड/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.

  संबंधित उमेदवार मुदतवाढीच्या दिनांकापर्यत रुजू न झाल्यास त्याप्रमाणे प्राधिकरणाच्या मध्यवर्ती कार्यालयास अवगत करावे. तसेच रुजू झालेल्या उमेदवारांचे रुजू अहवाल तात्काळ सादर करावेत.
- संचालक तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), शासकीय पाणी पुरवठा केंद्राच्या आवारात, आय.एस.पी. रोड., डिस्टलरी इस्टेट, नाशिक रोड.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग/विभाग (सर्व) ---------
- अवर सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई
- अवर सचिव, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर नवी मुंबई.
- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- वरिष्ठ लेखा अधिकारी (रोख शाखा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- ------------------------------------------------------------------.(रजिस्टर पोष्टाने)
- कार्यालयीन आदेश धारिका सन २०२६

Scanned with OKEN Scanner